| | महाराष्ट्र शासन<br>उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ कार्यालय,पुणे. | |
|---|---|---|
| दूरध्वनी क्रमांक | (०२०) २६०५२३०० (कार्यालय)<br>(०२०) २६१२६८७० (वैयक्तिक)<br>(०२०) २६१३५१३६ (फॅक्स)<br>ईमेल :-<br>cpmnrhmpune11@gmail.com | नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, विधान भवन समोर, पुणे - ४११००१.<br>जुना ई-मेलः- ddhspune@yahoo.co.in<br>नविन ई-मेल :- ddhs.pune-mh@gov.in |
| आरोग्य सेवा. | जा.क्र.उसंआसे/एनएचएम/स्टाफ नर्स नि. आ./६५२५-८८/२०२२<br>दिनांक :-२६/१२/२०२२ | |


**विषय - राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे स्टाफ नर्स या कंत्राटी पदावर नियुक्ती आदेश देणेबाबत.**

संदर्भ - १) मा. आयुक्त,आरोग्य सेवा, व अभियान संचालक, मुंबई यांचे पत्र क्र. जा.क्र. राआसोमुं / मनुष्यबळ कक्ष/पदभरती/११९९४६-१२०२०८/२०२२ दि.२०/०९/२०२२
२) दि.११ ऑक्टोबर २०२२ रोजी आरोग्य वेबसाइटवरील जाहिरात..
३) दिनांक १३/१२/२०२२, रोजीच्या या कार्यालयामार्फत आरोग्य व कुटूंब कल्याण औंध पुणे येथे घेतलेल्या मुलाखती.

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पदभरती प्रक्रिया सन २०२२-२३ अंतर्गत निव्वळ कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपात खालील नमुद कर्मचारी यांना दि.२७/१२/२०२२ ते २६/११/२०२३ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीनुसार नियुक्ती आदेश देणेत येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | मुळ प्रवर्ग | निवड प्रवर्ग | नियुक्तीचे ठिकाण | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १) | ललिता गुलाबसिंग पटले | अ.ज. | खुला | पिंपळे निलख दवाखाना, पिंपळे निलख गावठाण, मनपा शाळेसमोर, औंध कॅम्प पुणे २७ | २०,०००/- |
| २) | शिवकांता दत्ता वानोळे | खुला | खुला | चिंचवड स्टेशन दवाखाना, एमआयडीसी ऑफिस समोर, जैन स्थानकाशेजारी | २०,०००/- |
| ३) | रेशमा तुकाराम दगडे | अ.ज. | खुला | दिघी दवाखाना, जुना जकात नाका, दिघी गाव | २०,०००/- |
| ४) | सोनाली धर्माजी कोरगावकर | इ.मा.व. | खुला | चऱ्होली दवाखाना, चऱ्होली गाव | २०,०००/- |
| ५) | कोमल पांडुरंग भोसकर | खुला | खुला | ह.भ.प. मल्हारराव कुटे रुग्णालय, आकुर्डी रुग्णालय, आकुर्डी गांव, पुणे | २०,०००/- |
| ६) | तुकाराम दामोधर सुर्यवंशी | खुला | खुला | यमुनानगर रुग्णालय, यमुनानगर निगडी | २०,०००/- |
| ७) | सोनल येडबा वैरागे | अ.जा. | अ.जा. | पिपरी वाघेरे दवाखाना पिपरी वाघेरे गाव, पुणे | २०,०००/- |
| ८) | सिमा संतोष साळुंके | अ.जा. | अ.जा. | बिजलीनगर दवाखाना, बिजलीनगर पीसीएमसी बिल्डिंग रुम नं १ चिंचवड पुणे ३३ | २०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९) | शीतल प्रभाकर थोरात | अ.जा. | अ.जा. | घरकुल दवाखाना, घरकुल चिखली | २०,०००/- |
| १०) | लक्ष्मी तुमला पटेल | अ.ज. | अ.ज. | संभाजीनगर दवाखाना, साई अंब्रेला गार्डन, संभाजीनगर | २०,०००/- |
| ११) | दिक्षा बस्तर मडावी | अ.ज. | अ.ज. | पुनावळे दवाखाना, तलाठा कार्यालय शेजारी, पुनावळे गावठाण, पुनावळे | २०,०००/- |
| १२) | रोहिणी अतुलचंद्रा कोतक | अ.ज. | अ.ज. | दत्तनगर दवाखाना, राम मंदिराजवळ रामनगर-दत्तनगर, चिंचवड | २०,०००/- |
| १३) | वनिता व्यंकट सुरवसे | एन.टी.-सी | एन.टी.-सी | जिजामाता रुग्णालय, जुन्या डिलक्स टॉकीज जवळ, पिंपरी पुणे -१७ | २०,०००/- |
| १४) | पुजा युवराज आंधळे | एन.टी.-डी | एन.टी.-डी | नवीन थेरगाव रुग्णालय, थेरगांव गावठाण रोड, जगताप नगर थेरगाव | २०,०००/- |
| १५) | पारु तेजराव भिकनार | इ.मा.व. | इ.मा.व. | जिजामाता रुग्णालय, जुन्या डिलक्स टॉकीज जवळ, पिंपरी पुणे -१७ | २०,०००/- |
| १६) | रसिका सुरेश शेडेकर | इ.मा.व. | इ.मा.व. | जिजामाता रुग्णालय, जुन्या डिलक्स टॉकीज जवळ, पिंपरी पुणे -१७ | २०,०००/- |
| १७) | वैष्णवी लक्ष्मण काटकर | इ.मा.व. | इ.मा.व. | भोसरी रुग्णालय, अंकुशराव लांडगे, सभागृह समोर भोसरी गाव | २०,०००/- |
| १८) | राजेश कल्याण महालिंगे | इ.मा.व. | इ.मा.व. | बोपखेल दवाखाना, मारुती मंदिराजवळ बोपखेल गाव, बोपखेल | २०,०००/- |
| १९) | मीना नागनाथ पांढरे | इ.मा.व. | इ.मा.व. | तळवडे दवाखाना, देहु आळंदी रोड, तळवडे चौक, तळवडे | २०,०००/- |
| २०) | रेशमा रविंद्र राऊत | इ.मा.व. | इ.मा.व. | रुपीनगर दवाखाना, प्रबोधनकार ठाकरे प्राथमिक शाळा रुपीनगर | २०,०००/- |
| २१) | रामचंद्र संजय साळुंके | ई.डब्ल्यु.एस. | ई.डब्ल्यु.एस. | भोसरी रुग्णालय, अंकुशराव लांडगे, सभागृह समोर भोसरी गाव | २०,०००/- |
| २२) | पुजा रमेश ठोके | ई.डब्ल्यु.एस. | ई.डब्ल्यु.एस. | ह.भ.प. मल्हारराव कुटे रुग्णालय, आकुर्डी रुग्णालय, आकुर्डी गाव पुणे | २०,०००/- |

- राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी मार्फत पारित केलेले आदेश राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी / कर्मचारी यांना लागू राहतील.
- नियुक्ती किंवा नविन नियुक्ती आदेश या कार्यालयाकडून ज्या अधिकारी/कर्मचारी यांना देणेत आलेली आहे त्या अधिकारी / कर्मचारी यांची बदली किंवा प्रतिनियुक्ती इतर कोणत्याही विभागात किंवा त्याच विभागाकरता येणार नाही.

- या कार्यालयाकडुन देणेत आलेला नियुक्ती आदेश किंवा नियुक्ती आदेशाने नेमणुक करणेत आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना राजीनामा द्यावयाचा असेल तर उपसंचालक कार्यालयाकडुन राजीनामा मंजुर होईपर्यंत संबधित अधिकारी/कर्मचारी यांना राजीनामा द्यावयाचा असेल तर जिल्हा कार्यालयाकडुन राजीनामा मंजुर होईपर्यंत संबधित अधिकारी/कर्मचारी यांना संस्थास्तरावरुन कार्यमुक्त करता येणार नाही. कर्मचारी कार्यमुक्तीचे आदेश एनएचएम कार्यालयाकडुन मा. उपसंचालक यांची परवानगी घेतलेनंतर निर्गमित करणेत येतील.
- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करीत असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना आपला स्वतःचा मोबाईल फोन २४ तास जिल्हा कार्यालयाशी संपर्कात ठेवावा लागेल.
- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्येक आर्थिक वर्षात ८ नैमित्तीक रजा व ७ वैद्यकीय रजा मंजुर आहेत व महिला कर्मचारी यांचेसाठी प्रसुती रजा ६ महिने कालावधीसाठी मंजूर आहे.
- कार्यालयाची वेळ सकाळी ०९.४५ ते ०६.१५ पर्यंत राहील. वैद्यकिय सेवापुरविणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांची कार्यालनी वेळ ओपीडी/आयपीडी तासाप्रमाणे राहील.
- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांनी नियुक्ती कालावधी संपणेपुर्वी १ महिना अगोदर नियुक्ती प्रस्ताव जिल्हा कार्यालयाकडरील पत्र मिळालेनंतर मुदतीत सादर करावा. नियुक्ती प्रस्ताव वेळेत सादर न केलेस संबधित अधिकारी / कर्मचारी यांना पुढील कालावधीसाठी नियुक्तीची आवश्यकता नाही असे समजुन संबधिताना कामावरुन कमी केले जाईल.
- सदरची नेमणुक तात्पुरत्या स्वरुपाची असुन कंत्राटी कालावधी संपल्यानंतर संबधित पदावरील आपली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल यासाठी आपणांस कोणत्याही प्रकारची पूर्वसुचना व कारण न देता कमी करण्याचा हक्क जिल्हास्तरावर राखुन ठेवलेला आहे.
- उमेदवारास त्यागपत्र/राजीनामा द्यायवयाचे झाल्यास १ महिन्याची आगाऊ नोटीस अथवा १ महिन्याचे मानधन रोख भरावे लागेल. सदरची नेमणुक चांगल्या वर्तणुकीवर अवलंबुन राहील.
- वार्षिक कामाचे अहवालावरुन मुल्यमापन केले जाईल, काम असमाधानकारक आढळल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता कामावरुन कमी करणेत येईल.
- केंद्र शासनाने एखादे पद नामंजुर केल्यास त्या पदावर नेमणुक करणेत आलेल्या अधिकारी /कर्मचारी यांची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येतील.
- दि.२७/१२/२०२२ ते २६/११/२०२३ याकालावधीची नियुक्ती प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२२-२३ च्या अधीन राहुन देणेत येत आहे. केंद्र शासनाने सन २०२२-२३ करीता कोणत्याही पदास मान्यता दिली नाही अथवा भविष्यात इतर कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उद्‌भवल्यास सदर पदावरील कर्मचाऱ्यांची सेवा कोणतीही पुर्वसुचना व कोणतेही कारण न देता तात्काळ संपुष्टात आणली जाईल.
- मा.सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या संदर्भ क्र.१ च्या पत्रानुसार एनएचएम अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या पदस्थापनेत बदल करण्याबातचे कोणतेही अर्ज अथवा शिफारस उपसंचालक कार्यालयास सादर करु नयेत, तसे अर्ज प्राप्त झालेस त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
- करारपत्रात मुद्दा क्रं 8.C VI नुसार जर एखादा कंत्राटी अधिकारी / कर्मचारी ३ महिने विनापरवानगी रजेवर/गैरहजर असल्यास त्याची सेवा समाप्त होईल अशी नवीन अट समाविष्ट करण्यात आली आहे.
- अभियानांतर्गत विविध स्तरावर पदभरती करण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्ती आदेशात नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत असुन ही नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्प सुपष्टात येईपर्यत किंवा करारपत्र कालावधी समाप्ती नंतर संपुष्टात येईल.

- नेमणूक दिलेल्या उमेदवाराने करारनामा त्वरीत भरुन दयावयाचा असून करारपत्र रु.१००/- च्या बॉन्डपेपर वर तयार करुन ते **वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका** यांचे स्वाक्षरीसाठी पाठवून देणेचे आहे. त्या सोबत उमेदवाराचा हजर रिपोर्ट पाठविण्यात यावा. सदरचा बॉन्ड पेपर रुजू दिनांकापासून पुढील ११ महिन्याच्या कालावधीपर्यंत असेल.
- शासन सेवा शर्ती खाली ही नेमणूक नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन विमा योजना, भ.नि.नि अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाही. अथवा नेमणूक केलेल्या पदावर कंत्राटीमध्ये नमूद केलेल्या मुदती बाहेर कोणतेही अधिकार राहणार नाही.
- वरील उमेदवाराचे वेतन " **पिंपरी चिंचवड महानगरपालिके मधील, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, पुणे** यांचेकडून अदा करण्यात येईल.
- " **पिंपरी चिंचवड महानगरपालिका, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, पुणे** अधिनस्त काम करणेचे आहे. याठिकाणी रुजु अहवाल देवुन पदस्थापना घ्यावी.
- सदरची नेमणूक आदेश मिळाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत कामावर रुजू व्हावे लागेल अन्यथा सदरचे आदेश आपोआप रद्य होतील.

(डॉ.राधाकिशन पवार)
उपसंचालक,आरोग्य सेवा,
पुणे मंडळ पुणे

प्रती,
नियुक्ती देणेत आलेले सर्व कर्मचारी.

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव -
१) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर -
**मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राआअ, मुंबई.**